Rajendra Kakulte 2018

ISSN-2230-9578

Volume 8 (Special Issue 04)
January, 2018

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

UGC Journal list No. 64768



Editor : Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No- 23, Mundada Nagar,
Jalgaon(M.S.) 425102
Email – info@jrdrb.com Visit – www.jrdrvb.com

Scanned with CamScanner

V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

ISSN-2230-9578
COSMOS IMPACT FACTOR 4.27



| | | | |
|---|---|---|---|
| ४२ | शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारण मिमांसा | प्रा.श्रीमती.एम.व्ही.चौधरी, महीला महाविद्यालय, शिरपुर | १६६ |
| ४३ | भुमीकन्या बहीनाबाई चौधरी यांच्या काव्यातील ग्रामीण कृषी दर्शन | डॉ.संजय महाले, कला विज्ञान महाविद्यालय, धडगांव | १६९ |
| ४४ | ग्रामीण विकासात शेतीचे योगदान | प्रा.राठोड मदनसिंग सुपड्, आदर्श महाविद्यालय, निजामपुर | १७५ |
| ४५ | ग्रामीण विकासासाठी कृषीचे योगदान | डॉ.पंकज देवरे, कला विज्ञान महाविद्यालय, सोनगीर | १७९ |
| ४६ | ब्रिटीशांचे खानदेशातील कृषी विषयक धोरण आणि त्यांचे परिणाम | डॉ.संजय जिभाऊ पाटील, कला महाविद्यालय, नवलनगर | १८२ |
| ४७ | कृषी संस्कृती की गाथा गोदान | कैलास आखाडे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. | १८५ |
| ४८ | ग्रामीण कादंबरीतील दिसनारे कृषी व ग्रामीण जीवण | प्रा.राजेंद्र काकुस्ते, सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री | १८७ |
| ४९ | ग्राम–साहित्य मे कृषी विषयक विचार | डॉ.अशोक पवार, ग.तु.पाटील महाविद्यालय, नंदुरबार | १८९ |
| ५० | गोतावळातील यंत्र मानव संघर्ष | डॉ.सी.एस.रंगे, कला महाविद्यालय, बामखेडा | १९२ |
| ५१ | गराडा कादंबरीतील बदलत्या कृषी जिवणाचे स्वरूप | प्रा.किशोर पाठक, कला महाविद्यालय, चोपडा. | १९४ |
| ५२ | ग्रामीण साहित्य कादंबरीतील कृषी जीवन | प्रा. रामचंद्र रतन मालीच | १९७ |
| ५३ | नंदुरबार जिल्हयातील लोकसंख्या वाढीमुळे भूमी उपयोजनात झालेला बदल : भौगोलिक अध्ययन. | डॉ. नामदेव नरसिंगराव गजरे, नंदुरबार. | २०० |
| ५४ | हरितगृह परिणाम - एक अभ्यास | .डॉ. सुनिल विक्रम कुवर, नंदुरबार. | २०४ |



Scanned with CamScanner

Journal of Research & Development
Vol. 08 (Special Issue 04) January 2018, (ISSN-2230-9578)
UGC Journal List No. 64768, COSMOS IMPACT FACTOR- 4.270

V.V.M.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule

# "ग्रामीण कादंबऱ्यातून दिसणारे कृषि व ग्रामीण जीवन"

**प्रा. राजेंद्र जी. काकुस्ते,** (मराठी विभाग), विद्या विकास मंडळाचे सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री.

**प्रास्ताविक -**

कृषिप्रधान देश म्हणून प्राचीन काळापासूनची आपल्या देशाची ओळख आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करुन उपजिवीका करणारी समाज व्यवस्था प्रचलीत आहे. बदलत्या काळानुसार विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या झोतात कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग होऊ लागल्याचे दिसते. त्याचे दर्शन मराठी ग्रामीण साहित्यातून उमटलेले आहे. "साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब उमटते" या निकषानुसार मराठीतील ग्रामीण साहित्याचा विचार करता येईल. ग्रामीण साहित्याची सुरुवात ही गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या विचारधारेतून झालेली आहे. शहरी समाज जीवनाचे वर्णन मराठी साहित्यातून करणाऱ्या साहित्यिकांनी आपली दृष्टी ग्रामीण भागाकडे वळवली असता, ग्रामीण समाजव्यवस्था ही संमीश्र समाज व्यवस्था असल्याचे लक्षात आले. अनेक जातीधर्मांचे, विविध व्यवसाय करणारे, निरनिराळी भाषा बोलणारे, विभिन्न जीवन निष्ठा व श्रद्धा असणारे लोक ग्रामीण समाजात राहतात. असे असले तरी सर्वांचे जीवन हे कृषी (शेतीशी) निगडीत असल्याचे जाणवते. या गोष्टींचा विचार करुन ग्रामीण मानवी जीवनाचे वर्णन साहित्यातून होऊ लागले.

साहित्याच्या कथा, कादंबरी, कविता इ. प्रकारातून ग्रामीण जीवन चितारले जाऊ लागले. साहित्य आणि समाजव्यवस्था यांचा जवळचा संबंध आहे. किंबहुना साहित्य हे मानवी जीवनावरंच अवलंबून असते. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजापासून दूर राहू शकत नाही. त्यादिशेने साहित्याचा विचार होऊ लागला. यामुळे ग्रामीण जीवनातील कृषी क्षेत्राबद्दलाची माहिती साहित्यातून सहज उपलब्ध होऊ लागली. शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था असल्यामुळे ग्रामीण समाजजीवनावर बदलत्या जागतिकीकरणाचा परिणाम झालेला दिसतो. त्याचे वर्णन मराठी साहित्यकांनी आपल्या साहित्यातून चितारले आहे.

या संदर्भात प्रातिनिधीक स्वरुपात काही निवडक ग्रामीण कादंबऱ्यांच्या आधारे साहित्याचा कृषी व ग्रामीण जीवनाशी असलेला संबंध अधोरेखीत करता येईल. त्यात प्रामुख्याने ग्रामीणजीवनाचे दर्शन घडवणाऱ्या काही कादंबऱ्या सांगता येतील. आनंद यादवांच्या झोंबी, नांगरणी धरभिंती, गोतावळा इ. कादंबऱ्यांतून कृषि संस्कृतीचे जीवन चितारले आहे. यंत्रयुगाचा परिणाम ग्रामीण जीवनावर कसा झाला, त्यामुळे पारंपरिक कृषि, संस्कृतीवर एकप्रकारे आघात झाला याचे वर्णन 'गोतावळा' कादंबरीत आनंद यादव करतात.

'गोतावळा' कादंबरीतील 'नारबा' ही व्यक्तिरेखा पारंपरिक वेठबिगार असून तो बालपणापासून पोरका आहे. त्याला जमीनदार असणाऱ्या मालकाकडून अश्वासित केले जाते की, तुझा स्वतःचा गोतावळा निर्माण करुन देईल. या आशेवर तो जमीनदाराच्या शेतात राबतो. तेथील पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पती यात रमतो. तेच सारे त्याचे गणगोत बनून जातात. पण आधुनिकतेचा परिणाम म्हणून मालक नवीन ट्रॅक्टर विकत घेतो. ट्रॅक्टर हे यंत्र युगाचे प्रतिक आहे. ट्रॅक्टरसोबत ड्रायव्हर येतो. मालकाला नारबापेक्षा ड्रायव्हरची उपयुक्तता अधिक वाटू लागते. म्हणून तो ड्रायव्हर आता नारबापेक्षा महत्त्वाचा वाटू लागतो. ड्रायव्हरचे वाढते अस्तित्व नारबाला सहन होत नाही. त्याचबरोबर नारबाच्या गोतावळ्यातील जस-जसा एक-एक पशु-पक्षी कमी होऊ लागतात व उजाड माळरानावरील तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या फांद्या ह्या जणू आपल्या शरीराचे एक अवयव छाटल्याचे दुःख त्याला होऊ लागते. कारण त्या सर्वांशी नारबाचे भावनीक नाते जोडले गेलेले होते. या सर्वांबद्दल तो मालकाशी बोलतो तेव्हा मालक उद्दामपणे "तुला सहन होत नसेल तर तुझा तु रस्ता धर! असे म्हणतो. तेव्हा नारबाच्या पोटात गोळा उठतो व त्याच मन उद्विग्न होते. तेव्हा ते सर्व सोडून जातो. त्याचा भावनीक गोतावळा तुटतो. यावरुन आनंद यादवांची 'गोतावळा' ही कादंबरी म्हणजे एकाकीपणा, भय, क्रुरता, मृत्यु इ. गोष्टींचे प्राथमिक पातळीवरील चिंतनच होय. कृषि संस्कृतीवर यंत्र संस्कृतीचे झालेले आक्रमण होय. नारबा सारख्या सर्व सामान्य मजुराच्या जीवनाची झालेली वाताहत आहे. आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीतून शेती आणि ग्रामीण जीवनाची झालेली अधोगती प्रकट होते.

सदानंद देशमुख यांच्या 'तहान व बोरोमास' या कादंबऱ्यांतून बदलत्या राजकीय, आर्थिक धोरणांचा परिणाम ग्रामीण जीवनावर कसा होतो ते चितारले आहे. त्याचबरोबर दुष्काळासारख्या वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण जीवनावर पर्यायाने कृषी जीवनावर होणाऱ्या आघातांमुळे ग्रामीण मानवी जीवनाचे खच्चीकरण होतांना दिसले. सदानंद देशमुखांची 'तहान' ही १९९८ साली प्रकाशित झालेली कादंबरी होय. या कादंबरीत बदलत्या ग्रामीण जीवनात आजच्या तरुण पिढीची कोंडी कशी होते ते दाखवले आहे. तरुण पिढीला या परिवर्तनाच्या काळात अनेक ताण-तणावांना सामोरे जावे

Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Scanned with CamScanner